RNI No. MAHBIL/2009/36619

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र
# असाधारण भाग एक—कोकण विभागीय पुरवणी

वर्ष ६, अंक ३६(४)]  शुक्रवार, नोव्हेंबर ६, २०२०/कार्तिक १५, शके १९४२  [पृष्ठे २, किंमत : रुपये ११.००

## असाधारण क्रमांक ५८

## प्राधिकृत प्रकाशन

### महसूल व वन विभाग

**जिल्हाधिकारी, रायगड यांजकडून**

**अंतिम अधिसूचना**

क्रमांक मशा/प्रशा/अ-५/त.पुनर्रचना/२०१७.—ज्याअर्थी महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभागाकडील निर्णय प्राफेब-२०१० (तलाठी)/ प्र.क्र.११२ (भाग-३)/म-१०, दिनांक २५ मे २०१७ अन्वये राज्यातील वाढती लोकसंख्या व वाढते नागरीकरण या अनुषंगाने क्षेत्रीय महसूल यंत्रणेच्या कामात झालेली वाढ विचारात घेता राज्यात एकूण ३१६५ नवीन वाढीव तलाठी साझे व ६ तलाठी साझांसाठी १ महसूली मंडळ या तत्त्वाप्रमाणे सदर वाढीव तलाठी सझांसाठी ५२८ नवीन महसूली मंडळे स्थापन करण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे.

आणि ज्याअर्थी, मा.विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन यांनी त्यांचेकडील सुधारीत पत्र क्र.मशा/कार्या-५/प्रशासन/तलाठी सजा निर्मिती/२०१७, दिनांक ३० जून २०१७ व पत्र क्र. मशा/कार्या-५/प्रशासन/तलाठी सजा निर्मिती/२०१७ दिनांक ७ जुलै २०१७ अन्वये रायगड जिल्ह्यासाठी ११५ नव्याने निर्माण होणाऱ्या तलाठी साझांची संख्या निश्चित करुन दिलेली आहे.

आणि ज्याअर्थी, जिल्हाधिकारी, रायगड यांचेकडील पत्र क्रमांक मशा/प्रशासन/अ-५/ त.पुनर्रचना/ २०१७, दिनांक १९ जुलै २०१७ अन्वये जिल्ह्यातील तालुकानिहाय वाढ होणाऱ्या सझांची संख्या निश्चित करुन दिलेली आहे. तसेच शासन, महसूल व वन विभागाकडील निर्णय क्रमांक : प्राफेब-२०१०(तलाठी)/ प्र.क्र.११२ (भाग-३)/म-१०, दिनांक २५ मे २०१७ मधील परिच्छेद क्रमांक २(२) अन्वये सझांची फोड/पुनर्रचना करणेकामी नवीन साझांबाबतचे नकाशे व सीमा निश्चित करणे व नवीन साझांचे मुख्यालय कोणत्या ठिकाणी असावे, या सर्व बाबींचा सविस्तर अहवाल सादर करणेकरिता उप विभागनिहाय उपविभागीय अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली समिती गठीत करुन त्यांचेकडून रायगड जिल्ह्यातील उप विभागनिहाय होणाऱ्या सांझांची फोड/पुनर्रचना याबाबत साझांची निश्चिती करण्यात आलेली आहे.

आणि ज्याअर्थी, उपविभागीय अधिकारी, माणगांव यांनी त्यांच्या उपविभागातील माणगांव तालुक्यातील प्राप्त अहवालानुसार लोणेरे, साले व हरकोल तलाठी सझा पुनर्रचनेबाबतची प्रारुप अधिसूचना **महाराष्ट्र शासन राजपत्र** असाधारण भाग एक—कोकण विभागीय पुरवणी, मंगळवार, ऑक्टोबर २०, २०२०/आश्विन २८, शके १९४२ दिनांक १३ ऑक्टोबर २०२० रोजी प्रसिद्ध करणेत आली आहे. प्रारुप अधिसूचनेतील तलाठी सझांचे पुनर्रचनेच्या मसुद्याबाबत माणगांव उप विभागातील माणगांव तालुक्यामध्ये व जिल्हास्तरावर एकही हरकत किंवा सूचना प्राप्त झालेली नाही.

त्याअर्थी, आता, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ चे कलम ४, पोट-कलम (२) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन मी, **निधी चौधरी, जिल्हाधिकारी, रायगड** जिल्ह्यातील **तहसिल माणगांव** मधील **लोणेरे, साले व हरकोल** या तीन तलाठी सझांची पुर्नरचना करण्याबाबतच्या अधिसूचनेचा अंतिम मसुदा याद्वारे प्रसिद्ध करीत आहे, सदरहू अंतिम अधिसूचना प्रसिद्धीनंतर प्राप्त कोणत्याही हरकती किंवा सूचना विचारात घेतल्या जाणार नाहीत.

रायगड जिल्ह्यातील **उप विभाग माणगांव (तहसिल माणगांव)** यामधील पुनर्रचित तलाठी सझांचा तालुकानिहाय तपशिल खालील अनुसूची -अ मध्ये दर्शविल्याप्रमाणे आहे :—

**अनुसूची - अ**

**तालुका - माणगांव**

| अ.क्र. | उप विभागाचे नाव | तालुक्याचे नाव | पुनर्ररचनेनंतर अस्तित्त्वात आलेल्या सझांचा तपशील | |
|---|---|---|---|---|
| | | | सजेचे नांव व सजाच्या मुख्यालयाचे ठिकाण | सजेत समाविष्ट असलेल्या गावाचे नांव |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १ | माणगांव | माणगांव | **हरकोल** | गोवेले |
| २ | | | **(नवनिर्मित)** | हरकोल |
| ३ | | | | हरकोल कोंड |
| ४ | | | | अळसुंदे |
| ५ | | | | पळसप |
| ६ | | | | गोवेले कोंड |
| ७ | माणगांव | माणगांव | साले | साले |
| ८ | | | | कोशिंबळे त. तळे |
| ९ | माणगांव | माणगांव | साले | तिलोरे |
| १० | | | | वारक |
| ११ | | | | कुशेडे |
| १२ | | | | **विघवली** |
| १३ | | | तळाशेत | तळाशेत |
| १४ | | | (नवनिर्मित) | कशेणे |
| १५ | | | | दाखणे |
| १६ | | | लोणेरे | लोणेरे |
| १७ | | | | टेमपाले |
| १८ | | | | लाखपाले |
| १९ | | | | वडपाले |
| २० | | | | **उसरघर** |
| २१ | | | रेपोली | रेपोली |
| २२ | | | | न्हावे |
| २३ | | | | भाणदरे |

स्थळ :- अलिबाग,

दिनांक :- ६ नोव्हेंबर २०२०.

**निधी चौधरी,**
जिल्हाधिकारी, रायगड.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.